# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.
दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in
मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/सा.प्र./25/2021-22 दिनांक :01/04/2021.

**परिपत्रक**

**विषय:- परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती 2021 संबंधी मार्गदर्शक सूचना.**
**संदर्भ:- क्रमांक-संकीर्ण-0321/प्र.क्र.72/विशा-1अ दिनांक 09 एप्रिल, 2021.**

सालाबादप्रमाणे परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती या वर्षी दि.14 एप्रिल, 2021 रोजी साजरी केली जाणार आहे. सध्या कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता शासनाने दि.04 एप्रिल, 2021 नुसार पारीत केलेल्या आदेशानुसार व त्यातील मुद्दा क्र.1, 2 व 13 च्या अधिन राहून या वर्षी परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साधेपणाने साजरी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

1. दरवर्षी 14 एप्रिल या दिवशी परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक अनुयायी मोठया संख्येने जमुन तसेच जयंती दिनाच्या आदल्या दिवशी मध्यरात्री 12.00 वाजता देखील एकत्र येऊन परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती राज्यात ठिकठिकाणी साजरी करतात, परंतु यावर्षी कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव टाळण्यासाठी अत्यंत साधेपणाने सकाळी 07.00 वाजेपासून संध्याकाळी 08.00 वाजण्यापुर्वी परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करणे अपेक्षित आहे.
2. या वर्षी कोविड-19 विषाणुचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता दर वर्षीप्रमाणे प्रभात फेरी, बाईक रेली, मिरवणुका यावेळी जयंती निमित्ताने काढण्यात येऊ नयेत. त्याऐवजी परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला अथवा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतांना त्या ठिकाणी अनुयायांची संख्या एकावेळी 5 पेक्षा जास्त नसावी. तसेच तेथे सोशल डिस्टंन्सींगचे व स्वच्छतेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पालन करुन परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात यावी.
3. दरवर्षी परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करताना विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतु यावर्षी कोविड-19 विषाणुचा वाढता प्रादुर्भाव पहाता सार्वजनिक ठिकाणी गाणी, व्याख्याने, पथनाटय इत्यादीचे सादरीकरण अथवा इतर कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन जयंती निमित्ताने करण्यात येऊ नये. त्याऐवजी सदर कार्यक्रमाचे केबल नेटवर्कद्वारे अथवा ऑनलाईन प्रक्षेपण करता येईल.
4. परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी आरोग्यविषयक उपक्रम/ शिबिर (उदा.रक्तदान) स्थानिक प्रशासनाच्या पुर्वानुमतीने आयोजित करत येतील आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती

.../04/2021.

5. करता येईल. तथापि आरोग्य विषयक उपक्रमांचे आयोजन करताना त्या ठिकाणी सोशल डिस्टंन्सींग तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.
6. कोविड -19 विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनवर्सन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय, शिक्षण विभाग तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष जयंती दिनाचा कार्यक्रम सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत आणखी काही मार्गदर्शक सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

उक्त परिपत्रकाची सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करावी. सदरहू परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुद्ध यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**

**प्रत :-**

1) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2) मा.पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3) मा.राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
4) मा.महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
5) मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
6) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
7) मा.पोलिस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर वसई-विरार.
8) मा.जिल्हाधिकारी, जि.ठाणे.
9) मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/मा.सभागृह नेता/मा.विरोधी पक्षनेता/सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
10) स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
11) उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
12) सर्व सहा.आयुक्त/सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
13) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.